दिनांक - २५ मे,२०१७

## टिपणी

### "राज्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस/पारितोषिक योजना प्रस्ताव सादर करणे"

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन,प्रचार,प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक असून याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले आहे. या क्रीडा धोरणानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या खेळाडूंना तसेच त्यांचे क्रीडा मार्गदर्शक/प्रशिक्षक यांना रोख पारितोषिके देऊन गौरव करणेबाबतचा शासन निर्णय (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग -क्र. क्रीडाधो-२०१२/ प्र.क्र.१५८/ १२/क्रीयुसे-२. दि.५/२/२०१४) निर्गमित झाला असून सदर योजनेची अंमलबजावणी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे स्तरावर करण्यात येते.

ऑलिम्पिक स्पर्धा, विश्व अजिंक्यपद स्पर्धा, एशियन गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धा, युवा राष्ट्रकुल, एशियन चॅम्पियनशिप, युथ ऑलिम्पिक/ज्युनिअर एशियन/विश्व अजिंक्यपद स्पर्धा/शालेय आशियाई स्पर्धा, पॅरा आम्लिम्पिक स्पर्धा, पॅरा एशियन स्पर्धा इ.विविध अधिकृत आंतरराष्ट्रीय खेळांच्या अधिकृत संघटनाच्या वयोगटतील खेळाडूंनी प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे प्राविण्य प्राप्त केले असल्यास आपले खेळाचे प्रमाणपत्र तसेच संबधित राज्य/राष्ट्रीय खेळ संघटनाच्या शिफारसींसह रोख बक्षिस पारितोषिकासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरून आवश्यक कागदपत्रासह संबधित जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत किंवा आयुक्त,क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे यांचेकडे सादर करण्याचे आवाहन डॉ.विजय झाडे, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती करिता आपले जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे कार्यालय किंवा क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथिल कार्यालयाशी संपर्क करावा. (दुरध्वनी संपर्क -०२०-२७३९०३७१ विस्तारीत क्र.२१४)

(चंद्रकांत कांबळे)
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे